International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी समाजाचा स्वायत्ततेसाठी संघर्षः भारतीय इतिहासातील उठाव

**शितल देवदत्त वानखडे[1], प्रा. डॉ. हमराज उ. उईके[2]**
[1]*संशोधक*
[2]*मार्गदर्शक,मराठी विभाग, वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड*
*Corresponding Author – शितल देवदत्त वानखडे*
**DOI - 10.5281/zenodo.17656410**

**प्रस्तावना:**

आदिवासींबद्दल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे जंगल-दऱ्याखोऱ्यांत राहणारे रानटी, जंगली लोक. खरं पाहता आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी आहे. बाहेरून येणाऱ्या सबळांनी त्यांचे सखल प्रदेश व्यापले आणि त्यांना जंगल दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला ते कायमचे दूर झाले इतरांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे शेकडो वर्षे ते अज्ञानी आणि अशिक्षित राहिले. त्यांनी त्यांच्या मूळ संस्कृतीची मूल्ये मात्र जपली. निर्मळ अंतःकरण, प्रामाणिकपणा, मितभाषी ही बुद्ध तत्त्वज्ञानातील मुल्ये त्यांच्यामध्ये ओतपोत भरलेली आपणाला दिसतात. कारण बुद्ध म्हणतात सचित्त परियो दफनन एतं बुद्धान सासनं, म्हणजेच चित्ताची परिशुद्धता, निर्मळता हा गुण आदिवासीमध्ये आपणाला दिसतो. कारण त्यांच्याजवळ असलेली औषध वनस्पती अथवा मदत करतांना ते कसलाही भेदभाव न करता प्रामाणीकपणे आजारी व्यक्तीला औषधोपचार करतात. म्हणजेच चित्ताने ते परिशुद्ध असतात. तसेच बुद्धाच्या विचारातील निसर्गाविषयी प्रेम वृक्षाचे संवर्धन जो वृक्ष तोडेल त्याला दुप्पट दोष लागेल. असा विनय पिटकात विनय आहे. हा विनय आदिवासी लोक काटेकोरपणे जपत असतात. तसेच यज्ञामध्ये वृक्ष तोडून जाळले जात होते म्हणून यज्ञ संस्कृतीला त्यांचा विरोध होता कारण जंगल, जमीन ही त्यांची संपत्ती आहे. या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी त्यांना खुप संघर्ष करावा लागला. म्हणजेच त्यांची निसर्गप्रेमापासून वृत्ती ढळली नाही. वर निर्देश केल्याप्रमाणे काही लोक आदिवासींना आदिवासी न म्हणता 'वनवासी' किंवा 'गिरीजन' म्हणतात. या भूमीचे ते मूळ निवासी आहेत ही कल्पना त्यांना कदाचित रूचत नसावी. खरं पाहता या देशाचे मूळ रहिवासी मुळनिवासी वनवासी कसे असतील ? त्यांना 'वनवासी' तरी का म्हणावे? इतिहास आणि संस्कृतीसंघर्षाच्या कालचक्रात त्यांना हा वनवास कोणी दिला. वास्तविक या देशाची आदिवासी ही मूळ संस्कृती आहे. वैदिक संस्कृती त्यानंतर आली आदिवासींची श्रेष्ठ परंपरा आणि पराक्रमी इतिहासाची पाने काळाने पुसून टाकली. इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या विव्दानांना आदिवासी कधी दिसला नाही. त्यामुळेच आदिवासींचे मूळ रूप जनसामान्यापुढे आले नाही मात्र खोटा इतिहास लिहून दिशाभूल केली.

भारतभूमीचा बहुसंख्य भूभाग आदिवासी राज्यांनी व्यापलेला होता. मध्यभारतात वैभवशाली गोंड राज्ये होती. हजारो मैल लांब या साम्राज्याच्या

सीमा पसरल्या होत्या. हा सर्व प्रदेश 'गोंडवन' नावाने ओळखला जात होता. उत्तर पश्चिम भारतात भिल्लांची राज्ये होती. मारवाडचे पठार, माळव्याचे पठार ते थेट सातपुड्याच्या सातमाळा आणि महादेवडोंगर ते अजिंठ्यांच्या रांगा अशा विस्तीर्ण प्रदेशात या राज्यांच्या सीमा पसरल्या होत्या. 'भिलवाड' नावाने हा प्रदेश ओळखला जात होता. प्रसिध्द 'कलिंग' देशावरही भिल्लांचेच राज्य होते. भिल्लांच्या राजऐश्वर्याच्या आणि पराक्रमाच्या अनेक खुणा आजही या प्रदेशामध्ये दिसतात. उत्तर आणि पूर्व मध्य प्रदेशांत देखील नागा, मिझों, संथाळ, हूँ ओरॅान या आदिवासींची स्वतंत्र राज्ये होती. सह्याद्री पर्वताच्या सान्निध्यात देखील महादेव कोळी आणि कोकणा जमातीची स्वतंत्र राज्ये होती. त्यांचा प्रदेश 'कोळवण' या नावाने ओळखला जात होता.

सातपुडा, सह्याद्री व गोंडवन असे महाराष्ट्राच्या आदिवासींचे भाग पडतात. सह्याद्रीत ठाणे, पुणे, नाशिक, अहमदनगर, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा या जिल्ह्याचा जो डोंगरी भाग आहे, त्यात वारली, कातकरी, ठाकर, कोकणा, महादेव कोळी, मल्हार कोळी, या जमातींचे आदिवासी राहतात. सातपुड्यात धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, औरंगाबाद या जिल्ह्यांचा भाग येतो. त्यात कोरकू, भिल्ल, पावरा, गावीत, धनक, दुबळा व पारधी या आदिवासींची वस्ती आहे. तर गोंडवनात गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड या जिल्ह्यात गोंड, कोलम, परधान व माडिया या आदिवासी जमाती राहातात.

आर्य इराणमध्ये अनेक वर्ष निवास केल्यानंतर त्यांनी खैबर खिंडीतून भारताच्या 'सप्तसिंधू' प्रदेशात साधारणतः इ.स. पूर्व २००० मध्ये प्रवेश केला. 'सप्तसिंधू' प्रदेश म्हणजे ज्या भागातून सिंधू, झेलम (वितस्ता), चिनाब (असिकनी), रावी (परुष्णी), बियास (विपाशा), सतलज (शतद्रु), व सरस्वती (सप्तती) या सात नद्या वाहतात त्याला 'सप्तसिंधू' प्रदेश म्हटल्या जाते आणि अनार्याचा फार मोठा जत्था उत्तरेकडून दक्षिणेकडे म्हणजे आजच्या मध्य भारताकडे हाकलल्या गेला. आर्यांनी अनार्याचे दमन केले तरी मात्र त्यांची संस्कृती नष्ट करु शकले नाहीत. इंग्रजांनी १९२१ व २२ ला सिंधु नदीच्या खोऱ्यात उत्खनन केल्यामुळे सिंधु नदीच्या खोऱ्यात नव्या संस्कृतीचा शोध लागला. ही संस्कृती सिंधु नदीच्या परिसरात विकसित झाल्यामुळे या संस्कृतीला 'सिंधु संस्कृती' हे नांव देण्यात आले व सिंधु संस्कृती अनार्याची (आदिवासींची) संस्कृती असून ती वैदिक संस्कृतीच्या पूर्वीची अतिप्राचीन संस्कृती आहे हे सिद्ध झाले.

आर्यांनी अनार्यांना पराजीत करुन त्यांना दक्षिणेकडे म्हणजेच आजच्या मध्य भारतात जंगल, डोंगराळ भागात, नदी-नाल्यात हाकलून दिले आणि सप्तसिंधू प्रदेशात आर्यांनी निवास करुन अनेक टोळ्यांनी आपली लहान मोठी राज्ये स्थापन केली.

भारतातील सत्ता काबीज करण्याकरीता एकामागे एक भारतावर स्वाऱ्या होऊ लागल्या. या सगळ्यांचा केंद्रबिंदू अनार्य म्हणजे आदिवासी होय. संपूर्ण भारतात मोगलांचे साम्राज्य प्रस्थापित होत असतांना मध्यभारतात आदिवासींची राजसत्ता उदयास आली. त्या प्रदेशास 'गोंडवाना' असे म्हटल्या जाते. परंतू आदिवासींच्या राज्य कारभाराची इतिहासकारकांनी इतिहासात नोंद घेतली नाही. त्यामुळे आदिवासींच्या इतिहासाची नोंद पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नाही.

भारतात ब्रिटीश इंडस्ट्रीज कंपनीची राजकीय सत्ता येताच कंपनी सरकारने या देशात ब्रिटीशांच्या आर्थिक वसाहतीचे स्वरुप प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न या

देशातील लोकांवर व विशेष करुन आदिवासींवर अत्याचार व जुलूम केले. त्यांच्या परंपरा चालिरिती व संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आले. भारतात इंग्रजांची सत्ता येण्यापूर्वी अनेक राजवटी आल्या आणि गेल्याही परंतू आदिवासींच्या रुढी, परंपरा, संस्कृती व बोली भाषा नष्ट करु शकले नाहीत. त्या अजूनही कायमच आहेत. इंग्रजांनी आपल्या फायद्यासाठी आदिवासींचे उदरनिर्वाहाचे साधन असलेली वनसंपदा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर आदिवासींच्या वसाहतीवर सुद्धा आक्रमण झाले. त्यामुळे आदिवासी चिडले आणि इंग्रजांच्या या ध्येय धोरणाविरुद्ध शस्त्र उचलून अनेक आदिवासींना इंग्रजांविरुद्ध उठाव करावा लागला. आदिवासी भारताचे मुळ निवासी असल्याने परप्रांतातून आलेल्या लोकांचा सामना त्यांना प्रथम करावा लागला. भुमिचे मालक असलेले आदिवासी आणि त्यांच्या जमिनी कपटाने बळकावून त्यांना भुमिहीन करु पाहणारे यांच्यामध्ये जो काही संघर्ष झाला वा आदिवासींनी केला तो त्यांचा स्वातंत्र्याचा लढा होता. अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध तो लढा होता. आदिवासी समाजाचा स्वायत्ततेसाठी उठाव केलेले आहेत ती पुढीलप्रमाणे -

**भिल्लांचा उठाव:**

भिल्ल ही आदिवासी जमातीपैकी एक जमात आहे. भिल्लांनी ब्रिटीशांविरुद्ध अनेक उठाव केले. या उठावाचे नेतृत्त्व खाज्या नाईक, भीमा नाईक, भागोजी नाईक, मेवश्या नाईक, काळू भिल्ल, दौलू नाईक, कान्हू भिल्ल, तंट्या भिल्ल इत्यादींचा समावेश आहे. भिल्लांनी इंग्रज सरकार विरुद्ध इ.स. १८७० पर्यंत उठाव केला. भागोजी नाईक यांनी इंग्रजांना जेरीस आणले. कान्हा भिल्ल व तंट्या भिल्ल यांनी इंग्रज सरकारशी संघर्ष केला व त्यांना सळो की पळो करुन सोडले होते. म्हणजेच त्याचा प्रत्यक्षरित्या आपल्या स्वातंत्र्य चळवळीला मदत केली आहे. म्हणून त्यांचा स्वातंत्र्यामध्ये सिंहाचा वाटा आहे म्हणने वावगे ठरत नाही, परंतु त्यांचा हा इतिहास इतिहासकाराने दुर्लक्षीत ठेवला आहे ही शेकांतीका आहे.

**रामोशांचा उठाव:**

रामोशी ही एक आदिवासी जमात आहे. रामोशी मराठ्यांच्या सत्तेच्या काळात लष्करात होते. मराठा सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर रामोशी जमातीवर चोर, लुटारु, डाकू म्हणून त्यांच्यावर कडक निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे चिडलेली रामोशी जमात संघटीत होऊन इ.स. १८२२ मध्ये इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला. कालांतराने रामोशी जमातीचे नेतृत्त्व वीर उमाजी नाईक यांचेकडे गेले. त्यांनी सरकारला धारेवर धरले. त्यांनी इंग्रजांचे वर्चस्व झुगारले होते आणि त्यांनी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्नही केला होता. परंतू इंग्रजांनी रामोशींच्या विरुद्ध बलाचा प्रयोग केला आणि उमाजी नाईक यांना कपटाने पकडून इ.स. १८३२ साली त्यांना फाशी देण्यात आले आणि वीर उमाजी नाईक इतिहासात अजरामर झाले.

**हटकरांचा उठाव:**

बीड जिल्ह्यात मौसाजी होसाजी नाईकाने इंग्रजांविरुद्ध तीव्र उठाव केला तो हटकरांचा उठाव म्हणून जगप्रसिद्ध आहे. हटकरांनी नाव्हा येथे इंग्रजांना जबर टक्कर दिली. इंग्रजांना सुद्धा फार मोठा संघर्ष करावा लागला त्यात इंग्रजांची फार मोठी हानी झाली.

**संथालांचा उठाव:**

छोटा नागपूरात स्थायी झालेले संथाल लोक त्यांच्या या भागातील इंग्रजांनी जंगल तोड केली. त्यामुळे संथाल जमातीच्या लोकांनी चिंडून इंग्रजांविरुद्ध शस्त्र उचलले व त्याला हिंसक स्वरुप प्राप्त झाले. इंग्रज अधिकारी व आदिवासी मारले गेले शेवटी इंग्रज सरकारने आपल्या बंदुकीच्या जोरावर हा उठाव दाबून टाकला. हा उठाव इ.स. १८५५ मध्ये सिंधू व कान्हू या संथाल पुढाऱ्यांच्या पुढाकाराने झाला.

**मुंडा उठाव:**

छोटा नागपूर व सिंगभूम या जिल्ह्यात मुंडा आदिवासीचे वस्तीस्थान आहे. मुंडा जमातीवर इंग्रजांनी फार अन्याय व अत्याचार करुन त्यांच्या जमिनी लुटल्या. त्यामुळे मुंडा जमातीचे लोक चिडले व इ.स. १८३१ मध्ये इंग्रजांविरुद्ध मुंडांनी उठाव केला व या उठावाची इंग्रजांना फार मोठी किंमत मोजावी लागली. यात मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली. त्यामुळे मुंडांमध्ये असंतोष पसरु लागला आणि त्याचा परिणाम इ.स. १८५२ मध्ये पुन्हा मुंडा जमातीने उठाव केला. त्यात बिरसा मुंडाच्या नेतृत्वात इंग्रज सरकार विरुद्ध अनेक उठाव करण्यात आले. त्यामुळे हा उठाव बिरसाच्या नावाने ओळखला जावू लागला.

बिरसाने स्वतंत्र राज्य निर्मितीची घोषणा केली परंतु इंग्रज सरकारने आपल्या जोरावर हा उठाव दाबुन टाकला.

**कच्छ मधील उठाव:**

या भागातील आदिवासी शासक भारमल यांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केला. इंग्रज सरकारने कच्छमधील आदिवासी जनतेवर जाचक निर्बंध लादले. त्यामुळे असे उठाव करण्यात आले हे निबंध उठवण्याकरिता इ.स. १८३२ मध्ये एक मोठा उठाव करण्यात आला. त्यामुळे इंग्रज सरकारला आदिवासींच्या दबावाखाली जाहिरनामा प्रसिद्ध करावा लागला. त्यात कच्छ मधील आदिवासींचे सांस्कृतिक भावना दुखावल्या जाणार नाही याची सरकारने परिपूर्ण काळजी घेवून त्याची ग्वाही सरकारला आदिवासींना द्यावी लागली.

**कोल उठाव:**

छोटा नागपूर मध्ये कोल जमातीचे वास्तव्य होते. ज्या भागात कोल जमात राहत होती. तेथे ब्रिटीशांनी आक्रमण केले. कोल जमातीला हे आक्रमण सहन झाले नाही. म्हणून १८२७ मध्ये कोल जमातीने इंग्रजाविरुद्ध उठाव केला. परंतु इंग्रजांनी आपल्या शस्त्राच्या जोरावर हा उठाव दडपून टाकला व इंग्रजांनी अनेक आदिवासी लोकांना कुर शिक्षा केली व त्यांच्याकडून खंडणी वसुल केली.

त्याचबरोबर देशाच्या स्वातंत्र्याकरीता व इंग्रजांकडून होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आदिवासींनी अनेक उठाव केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे - १) इ.स. १७५६ ते १७७३ -पहाडी आंदोलन, २) इ.स. १७९५ ते १८०० -चुवार आंदोलन, ३) इ.स. १८१९ ते १८४२-गोंड आंदोलन, ४) इ.स. १८३१ ते १८३२-कोल आंदोलन, ५) इ.स. १८५५ ते १८५६- खेरवार (संथाल) आंदोलन, ६) इ.स. १८५९ ते १८९४ -सरदार मुंडा आंदोलन.

यात आदिवासींनी इंग्रजांशी मोठ्या प्रमाणात संघर्ष केला. त्यामुळे भारतात आपल्या न्याय हक्कासाठी शोषणमुक्त होण्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध आवाज उठविणारे आदिवासी हे प्रथम आंदोलनकर्ते होते. असे अनेक उठाव व आंदोलने करून त्यांनी भारताला स्वातंत्र्य

मिळविण्यासाठी मोलाचे योगदान केले आहे. तसेच त्यांच्या स्वायत्ततेसाठीचा संघर्ष म्हणावा लागतो. त्यांच्या उठावाने भारताला व भारतीय नैसर्गिक परिस्थितीला फार मोठे बळ मिळाले आहे.

**संदर्भ:**


१) प्रा. मा. म. देशमुख, प्राचीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपुर, १९९८
२) डॉ. कृष्णाकांत डोंगरे, भारतीय नागवंशीयांची शौर्यगाथा, बहुजन साहित्य प्रकाशन, केंद्र नागपूर, २०१८
३) अनु. मा. शं. मोरे, विनयपिटक भाग-३, चल्लवग्ग (मराठी), कौशल्या प्रकाशन, हडको, औरंगाबाद, २०१३
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांती आणि प्रतिक्रांती, सुगत प्रकाशन, नागपुर, २००६
५) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ डॉ. गोविंद गारे, सुगावा प्रकाशन-पुणे
६) आदिवासी महानायकांचे चरित्र शेषराव एन्. मडावी
७) आदिवासी स्त्री जीवन प्रा. सुमन मुठे
८) भारतीय आदिवासी- प्रा. डॉ. गुरुनाथ द. नाडगोंडे
९) महाराष्ट्रातील आदिवासी सुरेशचंद्र वारघडे, वनश्री प्रकाशन, पुणे